अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# बनावट नोटा म्हणजे पाकच्या छुप्या युध्दाचा पुरावा

बनावट नोटांच्या छपाईमध्ये पाकिस्तानचा हात असल्याचे आता पुराव्यानिशी सिध्द होत आहे. गेल्या वर्षभरामध्ये देशात जवळपास एक हजार कोटींच्या बनावट नोटा ठिकठिकाणी जप्त केल्या गेल्या. तर त्यापूर्वी म्हणजे २००९ साली मुंबईत अशाच बनावट नोटा चलनामध्ये घुसवण्याचा प्रयत्न करणाऱ्या सहाजणांना अटक केली गेली होती. त्यांच्याकडे असलेल्या नोटा आणि याच कालावधीमध्ये चंदीगढ, चित्रदुर्ग, काश्मिर, मध्यप्रदेशातले बढवाणी, भोपाळ, गोव्यातले वास्को आणि महाराष्ट्रातल्या ठाणे इथे बोगस नोटा जप्त केल्या गेल्या. या नोटांचे वेगवेगळ्या शहरातील नमुने गोळा करून त्याची सूक्ष्म तपासणी केली गेली. रिझर्व्ह बँकेच्या तज्ज्ञांनीदेखील या नोटा म्हणजे भारतीय अधिकृत चलनाची हुबेहुब नक्कल असल्याचे मान्य केले. त्यासाठी तितकीच आधुनिक मशीनरी वापरली गेल्याचे आढळून आले. कालांतराने जागतिक स्तरावर अशा प्रकारच्या बोगस चलनाविषयी माहिती घेणाऱ्या फायनान्शिअल ॲक्शन टास्क कोर्स या आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या संस्थेकडे याबाबतची तक्रार पोहचवली गेली आणि त्यातून भारतीय नोटांची बनावट छपाई करण्याचे काम पाकिस्तानमधूनच होत असल्याचे आढळून आले. गेल्याच आठवड्यात मुंबईच्या माजगाव न्यायालयाने बनावट नोटांप्रकरणात निकाल देताना त्यातील सहाहीजणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या बनावट नोटा देशाच्या चलनामध्ये घुसवणे हा दहशतवादाचाच भाग आहे, असे स्पष्ट मत न्यायालयाने नोंदवले. या सगळ्या घटनाक्रमांचा निष्कर्ष काढला, तर पाकिस्तान भारताशी छुपे आर्थिक युध्द खेळत आहे हे सिध्द होते. नियंत्रण रेषेवर होणारी धुमश्चक्री हा तर एक युध्दाचा भाग असतोच. शिवाय देशाच्या विविध भागात हल्ले करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न पाकिस्तानातील अतिरेकी संघटना करतात. याशिवाय भारताची आर्थिक व्यवस्था खिळखिळी व्हावी, अशा उद्देशानेच बनावट नोटांचे कारस्थान अतिशय योजनाबध्द रीतीने घडवले जाते हे आता स्पष्ट झाले आहे. म्हणूनच ठिकठिकाणी सापडणाऱ्या या बनावट नोटांचे साठे म्हणजे साधेसुधे प्रकार नाहीत. ते आर्थिक आघाडीवरचे पाकिस्तान खेळत असलेले युध्दच म्हणावे लागेल तरच त्याच्याशी सामना करता येईल. कारण देशाच्या अधिकृत चलनाचीच नक्कल करायची आणि आपला कार्यभाग साधायचा असा अतिशय गंभीर प्रकार घडतो आहे. आतापर्यंत सरकारने या विषयाकडे गांभीर्याने पाहिले नाही. त्याचे धागेदोरे आंतरराष्ट्रीय स्तरावर आहेत आणि या बनावट नोटांचा उगम पाकिस्तानातच आहे हे समजल्यावर सरकार किती जागे होते, यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत.

### दहशतवादी जाळे घट्ट होते

प्रामुख्याने पाचशे आणि हजारांच्या नोटांमध्ये ही बनावटगिरी मोठ्या प्रमाणावर दिसून येते. कोऱ्या करकरीत आणि अजिबात कोणालाही शंका येणार नाही अशा या नोटा तितक्याच काळजीपूर्वक आणि धीम्या गतीने चलनामध्ये घुसवल्या जातात. याबाबतची कार्यपध्दतीसुध्दा भारतीय तपास यंत्रणांनासुध्दा गोंधळात टाकणारी ठरली आहे. परंतु या नोटांचा प्रसार करण्याकरिता जे पाकिस्तानी हस्तक आणि दहशतवादी संघटनांचे जाळे उपयोगात आणले जाते. त्यांनी देशाच्या दुर्गम आणि ग्रामीण भागाची निवड केलेली पहायला मिळते. राष्ट्रीय तपास यंत्रणा म्हणजे एनआयएला बनावट नोटांची बंडले गोव्यापासून ते थेट केरळपर्यंत आणि ठाण्याच्या आदिवासी भागांपासून ते मध्य प्रदेशच्या बडवाणीसारख्या दुर्लक्षित अशा शहरांपर्यंत आढळून आली. एक हजाराच्या टू ए क्यू या सीरीजमधल्या बनावट नोटा राष्ट्रीय तपासयंत्रणेने सलगपणे गोळा केल्या. त्याच्या सगळ्या प्रकारच्या तपासण्या केल्यानंतर एका विशिष्ट मशिनवर त्याची छपाई होत असल्याचे लक्षात आले. पाकिस्तानातल्या काही चलनाची छपाईसुध्दा तशाच प्रकारच्या मशिनवरून होत असल्याने बनावट नोटांच्या छपाईत पाकिस्तानचाच हात असल्याचे आपोआप सिध्द झाले. बनावट नोटा तिथेच छापायच्या, तिथल्याच दहशतवाद्यांच्या हातात त्या द्यायच्या आणि भारतात येऊन त्याच्या मोबदल्यात अधिकृत नोटा वापरण्यासाठी मिळवायच्या असा हा दहशतवाद्यांचा कट दिसून येतो. बनावट नोटा दिल्यानंतर खऱ्या नोटांचा वापर करून भारताच्याच वेगवेगळ्या भागात आपले जाळे घट्ट करायचे. काही बेरोजगार तरुणांना हाताशी धरून या नोटांच्या प्रसारासाठी कमिशन द्यायचे आणि अनेक ठिकाणी थेट तरुणांचीच भरती करण्याकरिता खऱ्या नोटांचा उपयोग करून घ्यायचा, अशा प्रकारचे हे छुपे युध्द खेळले जात आहे. कोणताही गाजावाजा होऊ न देता किंवा, कोणालाही त्याची शंका येणार नाही अशापध्दतीने या भारतविरोधी कारवाया सुरू आहेत. त्याचे महत्त्व एखाद्या मोठ्या युध्दाइतकेच मानले पाहिजे.

### पाकवर दडपण आणावे लागेल

कोणत्याही देशाच्या दृष्टीने दोन गोष्टी महत्त्वाच्या असतात. सुरक्षित राष्ट्र त्यालाच म्हटले जाते की, ज्याने आपल्या सीमा आणि देशाचे चलन संरक्षित ठेवले आहे. आतापर्यंत भारतीय चलनाला इतक्या मोठ्या प्रमाणावर धोका निर्माण झालेला नव्हता. मात्र प्रामुख्याने गेल्या पाच वर्षांत तो प्रचंड गतीने वाढला. ज्या वेगाने बनावट नोटा पसरवल्या गेल्या, त्यावरून हे पाकिस्तान पुरस्कृत कारस्थान असल्याचे स्पष्ट झाले. आज तर भारतामधल्या बँकांना बनावट नोटा शोधण्याकरिता महागडी खास यंत्रे बसवावी लागत आहेत. बनावट नोटांचे प्रमाण इतके वाढले आहे की, या नोटा ओळखणाऱ्या यंत्रांची मागणीही वाढली आणि त्या बनवणाऱ्या फॅक्टऱ्याही वाढल्या. अनेक राष्ट्रीयीकृत बँकांनासुध्दा अधिकृतपणे जाहिरात देऊन बनावट नोटा शोधणारी यंत्रे विकत घ्यावी लागली आहेत.परंतु बँकांच्या बाहेर गावातल्या आठवडेबाजारात किंवा मुंबई दिल्लीसारख्या गर्दीमध्ये रोज किमान पाच पन्नास हजारांच्या बनावट नोटा घुसवल्या जात असाव्यात. खरे तर रिझर्व्ह बँकेने सगळ्या बँकांकडे गोळा झालेल्या बनावट नोटांची आकडेवारी जाहीर केली पाहिजे. तसेच बनावट नोटा सापडणाऱ्या प्रकारांची संख्यादेखील नोंदली पाहिजे. त्यावरून हे छुपे युध्द आता कसे निकराच्या लढाईत आले आहे हे सिध्द होईल. अर्थमंत्रालय, गृहमंत्रालय आणि वेगवेगळ्या राज्यांच्या तपास यंत्रणांच्या समन्वयातूनच या युध्दाला थोडाफार पायबंद बसेल आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर असलेल्या संस्थेमार्फत पाकिस्तानवर दबाव टाकून त्याने या कुरापती बंद कराव्यात म्हणून तितकाच सज्जड दम द्यावा लागेल.